**ठळक बातम्या**

- युपीआय प्रणालीची सुरुवात हा भारताच्या डिजिटल पेमेंट इतिहासातला सर्वात मोठा निर्णायक क्षण असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- शुल्कमुक्त तत्वावर आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून विक्री करण्याच्या कालावधीत बदल

- बाजारातली कृत्रिम तेजी ओसरू लागल्यानं राज्यात साखरेचे भाव नियंत्रणात

- राज्यात आदिवासी वसतीगृहातल्या प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट रद्द

**आणि**

- भारताविरूद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात फॉलोऑन टाळण्यासाठी श्रीलंकेला आणखी ३९ धावांची गरज

**<><><><><>**

युनिफाइड पेमेंट इंटरफेस अर्थात युपीआय प्रणालीला १० वर्षे पूर्ण झाली आहेत. २०१६ मध्ये या डिजिटल पेमेंट प्रणालीचा प्रारंभ झाला होता. तेव्हापासून आजपर्यंतच्या वाटचालीत युपीआय हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे. या प्रणालीमुळे महिला, छोटे व्यापारी, विद्यार्थी आणि नवउद्योजकांना आर्थिक व्यवहार अधिक सुलभतेनं तसंच, सुरक्षित स्वरुपात आणि तत्काळ करणं शक्य झालं आहे. युपीआय या डिजिटल क्रांतींचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला हवा असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. युपीआयला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर संदेश सामायिक केला आहे. युपीआय प्रणालीची सुरुवात हा भारताच्या डिजिटल पेमेंट इतिहासातला सर्वात मोठा निर्णायक क्षण ठरला, असं त्यांनी या संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील युपीआयला दहा वर्षं पूर्ण झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. युपीआय ही जगातली सर्वात मोठी वास्तव वेळेतली पेमेंट व्यवस्था असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं शुल्कमुक्त तत्वावर आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून तिची विक्री करण्याच्या कालावधीत बदल केला आहे. यानुसार आता आयातदारांना बिल ऑफ एंट्री दाखल केल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत कच्च्या साखरेचं रिफाइंड साखरेत रूपांतर करून ती देशांतर्गत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करावी लागेल. आगामी सणासुदीच्या काळात देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता वाढावी आणि किमतींवरचा ताण कमी करता यावा यासाठीच्या प्रयत्नांचा भाग म्हणून सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

परकीय व्यापार महासंचालनालयानं ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला टॅरिफ रेट कोटा योजनेअंतर्गत १० लाख टन कच्च्या साखरेच्या आयतीला परवानगी दिली होती. या आयात केलेल्या कच्या साखरेवर प्रक्रिया करून, ती ३१ ऑक्टोबरपर्यंत देशांतर्गत बाजारात विकण्याची कालमर्यादा निश्चित केली गेली होती. मात्र देशांतर्गत बाजारात साखरेच्या दरात झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर, आता ही कालमर्यादा बिल ऑफ एंट्री दाखल केल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त दोन महिन्यांची केली गेली आहे. इतर कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये बदल केला नसल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

साखरेच्या दरात आज पुन्हा एका रुपयानं वाढ झाली आणि १ किलो साखरेचा दर जवळपास ६४ रुपयांपर्यंत गेला. ग्राहक व्यवहार मंत्रालयानं एकत्रित केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या महिन्यात सुमारे ४९ रुपये प्रति किलो या दरानं साखर मिळत होती. महिनाभराच्या कालावधीत यात ३१ टक्के वाढ झाली आहे.

<><><><><>

राज्यातल्या शेतकऱ्यांना दररोज १२ तास मोफत वीज देण्याची आणि शेतकऱ्यांची ५८ हजार कोटी रुपयांची थकित वीजबिलं माफ करायची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज अहिल्यानगर इथं केली. सध्या राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज मिळत असल्याचं त्यांनी सांगितलं. आत्तापर्यंत १२ लाख ५० हजार शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये कर्जमाफीची रक्कम जमा झाली असून एकंदर ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रं, तसंच जात वैधता प्रमाणपत्रं देण्यासाठी वंशावळ जुळवण्याची प्रक्रिया करणाऱ्या तालुकास्तरीय तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालच्या समित्यांना मुदतवाढ द्यायचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. १ जुलै २०२६ ते ३० जून २०२७ या एका वर्षासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यातल्या काही जिल्ह्यांमध्ये वंशावळी जुळवण्याचं काम अजून पूर्ण झालेलं नसल्यानं ही मुदतवाढ द्यायचे निर्देश मराठा आरक्षणासंदर्भातल्या मंत्रिमंडळ उपसमितीनं दिले होते.

**<><><><><>**

आदिवासी विभागाच्या वसतिगृहांमधल्या प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट रद्द करत असल्याची घोषणा आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केली आहे. उईके यांनी आज राज्यभरातले आदिवासी समाजातले आमदार आणि खासदारांसोबत बैठक घेतली. या बैठकीनंतर बातमीदारांशी बोलतांना उईके यांनी या निर्णयाची माहिती दिली. राज्य शासनाच्या याआधीच्या निर्णयानुसार वसतिगृहातील प्रवेशासाठी ३० वर्षे वयाच्या मर्यादेची अट होती. ही अट रद्द करण्याच्या मागणीसाठी पुण्यात आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु होतं. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्याचं आवाहन केलं होतं.

**<><><><><>**

भारत आणि श्रीलंका यांच्यात कोलंबो इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या तिसऱ्या दिवसअखेर श्रीलंकेसमोर फॉलोऑनचा धोका कायम आहे. आजचा खेळ थांबला तेव्हा श्रीलंकेनं आपल्या पहिल्या डावात ८ बाद २६५ धावा केल्या होत्या. फॉलोऑनची नामुष्की टाळण्यासाठी श्रीलंकेला अजून ३९ धावांची गरज आहे.

आज सकाळी श्रीलंकेनं आपला पहिला डाव कालच्या २ बाद ८ या धावसंख्येवरून पुढे सुरु केला. मात्र प्रसिद्ध कृष्णा यानं सलामीवीर कमील याला लवकर माघारी धाडत श्रीलंकेला तिसरा धक्का दिला. श्रीलंकेच्या डावात आधी चौथ्या गड्यासाठी कामिंदू यानं अर्धशतकवीर परिसंदूसोबत ८७ धावांची, आणि नंतर आठव्या गड्यासाठी सोनल दिनुशा आणि केशारा यांनी ५७ धावांची भागिदारी करत पडझड थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र

भारताच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर श्रीलंकेचे इतर फलंदाज टिकाव धरू शकले नाहीत. खेळ थांबला तेव्हा सोनल ८५, तर लाहिरु ८ धावा करून खेळपट्टीवर टिकून आहेत.

भारताकडून प्रसिद्ध कृष्णा आणि मानव सुतार यांनी प्रत्येकी ३ तर, सिराज आणि जडेजा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

<><><><><>

वैश्य वाणी समाजातल्या पात्र व्यक्तींना शासनाच्या विविध योजना, सवलती आणि शासकीय लाभ मिळताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. वैश्य वाणी समाजाच्या जातीच्या प्रमाणपत्र पडताळणीसह विविध प्रलंबित मागण्यांबाबत मंत्रालयात सविस्तर चर्चा करण्यात आली होती.

<><><><><>

निवृत्त न्यायमूर्ती सुनील बाळकृष्ण शुक्रे यांना आज राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्याच्या लोकायुक्त संस्थेचे अध्यक्ष म्हणून शपथ दिली. मुंबईतल्या लोकभवनात हा शपथविधी सोहळा झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

राज्यातल्या गरजू रुग्णांना किडनी आणि यकृत प्रत्यारोपणाची सुविधा शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून देण्यासोबत प्रत्यारोपणाची संख्या वाढवण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयांमध्ये किडनी आणि यकृत प्रत्यारोपणाच्या सुविधांबाबत मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

<><><><><>

मुंबई आणि उपनगरातल्या इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग, भटक्या विमुक्त जाती आणि जमाती प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांना scholarship.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ ऑगस्ट असून अर्ज पडताळणी १५

सप्टेंबरपर्यंत होईल. त्यानंतर जिल्हा, राज्य आणि मंत्रालयीन स्तरावर पडताळणीची प्रक्रिया ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या मासवण इथल्या अनुदानित आश्रमशाळेत सात वर्षाच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याच्या घटनेत हलगर्जीपणा दाखवल्याबद्दल प्रशासनानं संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. यासोबतच संस्थाचालक, मुख्याध्यापक आणि वर्गशिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या घटनेच्या चौकशीसाठी विशेष समितीचीही नियुक्ती केली गेली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती प्रकल्प अधिकारी विशाल खत्री यांनी दिली.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**